# मेट्रो-३ स्थानकांच्या नावाचे हक्क वितरणात बीकेसीला सर्वाधिक पसंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गावरील स्थानकांच्या नावाचे अधिकार हक्क मिळविण्यासाठी अनेक नामांकित कंपन्यांनी भरघोस प्रतिसाद दिला आहे. एकूण २८ नामांकित ब्रॅण्ड्स मेट्रो ३ स्थानकांच्या नावाचे अधिकार हक्क घेण्यास उत्सुक असून, काही कंपन्यांनी एकाहून अधिक स्थानकांच्या नाम अधिकारासाठी स्वारस्य दाखविले आहे.

विविध कंपन्यांद्वारे १८ स्थानकांसाठी एकूण ८७ स्वारस्य अर्ज मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला प्राप्त झाले आहेत. त्यापैकी शहरातील अत्यंत महत्त्वाचे व्यापारी केंद्र समजल्या जाणाऱ्या वांद्रे कुर्ला संकुल (बीकेसी) मेट्रो स्थानकासाठी सर्वाधिक १२ अर्ज आले. तर दादर स्थानक, आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी प्रत्येकी ९ अर्ज प्राप्त झाले आहेत. ही दोन्ही स्थानके दुसऱ्या स्थानावर आहेत. त्यानंतर स्थानिक विमानतळ व सीएसएमटी स्थानकाकरिता प्रत्येकी ७ अर्ज आले.

नाम अधिकार हक्क मिळविण्यासाठी एल.आय.सी., इंडियन ऑइलसारख्या सार्वजनिक उपक्रम संस्था; तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, यू.टी.आय., कोटक, आय.डी.एफ.सी. सारख्या बँका आणि आर्थिक संस्थाही आहेत. याशिवाय इंडिगो, स्पाईसजेटसारख्या विमान कंपन्या आहेत. तसेच जे. एस. डब्लू., ग्लॅक्सो स्मिथ क्लाईन, टाइम्स समूह, ब्लॅकस्टोन, फिनिक्स मिल्ससारख्या कॉर्पोरेट कंपन्या आणि पिरामल, ओबेरॉय, डी. बी. रिअल्टीसारख्या अनेक नामांकित कंपन्या आहेत.